# प्रकरण तिसरे

# सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता

## प्रकरण तिसरे

## सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता

नगरपालिकेने उभारलेल्या नागरी सेवांमध्ये प्रामुख्याने सामाजिक आरोग्याला अतिशय महत्वाचे स्थान आहे. कारण यावरच लोकांचे भवितव्य अवलंबून असते. सार्वजनिक आरोग्य रक्षण व प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे हे प्रामुख्याने नगरपालिका आरोग्य खात्याचे महत्वाचे काम असते. सार्वजनिक आरोग्य जर चांगले असेल तरच नगरपालिकेला इतर कार्यक्रम यशस्वीपणे राबविता येतात. त्यासाठी १९२५ च्या बॉम्बे म्युनिसिपल ॲक्ट प्रमाणे या खात्यातंर्गत खालील कार्यक्रम आखले जातात.

१. साथीचे आजारावर नियंत्रण ठेवणे

२. रोगाच्या साथीवर नियंत्रण व उपचार

३. केरकचरा गोळा करणे व त्याचा विनीयोग

४. कचरा व घाणीचे स्थलांतर करणे

५. मांस व मासे बाजाराची व्यवस्था करणे

६. स्मशान भूमी व प्रेत पुरणेच्या जागेची व्यवस्था करणे

वरील उद्देश डोळयासमोर ठेवून कराड नगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व शहर सफाई यांच्या सुविधा लोकांना पुरविल्या आहेत.

नागरिकांना औषधोपचाराची सोय व्हावी व वारंवार येणा-या साथींना आळा बसावा यासाठी शहरात कमेटीचा दवाखाना असावा अशी नगरपानिकेने सरकारकडे ता. ९ ऑगष्ट १८५६ रोजी यादी पाठवून मागणी केली[१]. त्यावरुन ता. १९-८-१८५६

रोजी डॉ. सिवर्ड यांनी कराडास भेट दिली. शहरात कमेटीचा दवाखाना असावा अशी त्यांनी सरकारकडे शिफारस केली. त्यास लागणारा खर्च कमेटीचे फंडातून व आसपासचे गावातून जमा करावा आणि त्या दवाखान्याचा फायदा कराड व आसपासच्या गावांना द्यावा असे हि सुचविले या कल्पनेस १८६५ साली मूर्त स्वरुप आले. १८६५ च्या मार्चमध्ये नगरपालिकेचा स्वतंत्र दवाखाना सुरु झाला[२]. यामुळे सोय तर झालीच शिवाय तालुक्यातील बाहेरचे लोकही औषधोपचारासाठी नगरपालिकेच्या दवाखान्यात येऊ लागले.

सातारहून धारवाडकडे जाणा-या रस्त्यावर म्हणजे सध्याचा म्युनिसिपल दवाखाना ज्या ठिकाणी आहे त्या जागेत नगरपालिकेने रु. १८९४-११-० खर्च करुन सन १८५९ साली एक धर्मशाळा बांधली होती[३]. त्याच इमारतीत नगरपालिकेने आपला दवाखाना सुरु केला. दवाखान्याच्या पाठीमागे एक बागही तयार केली.

रामचंद्र दाजी डॉक्टर हे नगरपालिकेचे दवाखान्याचे पहिले डॉक्टर होते. सुरुवातीस नगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये खालील नोकर वर्ग होता[४].

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रामचंद्र दाजी | - डॉक्टर पगार | ४० रु. |
| २. | सिताराम रामकृष्ण भंडारी | - विद्यार्थी पगार | ५ रु. |
| ३. | अल्ली मंहमद कागदी | - शिपाई पगार | ३ रु. |
| ४. | मारुती बाबाजी | - भिस्ती पगार | २ रु. |
| ५. | चिमणा सुभाना | - भंगी पगार | १ रु. |

नगरपालिकेच्या दवाखान्यात तालुक्यातील अपघाती मृत्युच्या केसेस तपासणीसाठी येत असत. शिवाय मेडिको लीगल केसेसचे कामाचा भारहि म्युनिसिपल

दवाखान्यावर होता. या कामासाठी सन १८७८-७९ सालापासून सरकारने म्युनिसिपल दवाखान्यास वार्षिक रु. ७५० प्रमाणे ग्रँट देण्यास सुरुवात केली.

म्युनिसिपल दवाखान्यात सुरुवातीपासून असलेले डॉ. रामचंद्र दाजी यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी १८७८ हॉस्पिटल असि. म्हणून हरी रघुनाथ बापट यांची नेमणूक करण्यात आली.

त्यानंतर १९०९ मध्ये म्युनिसिपल दवाखान्याच्या इमारतीत सोईस्कर दुरुस्त्या करुन एक 'पोस्ट मार्टेम' रुम बांधण्यात आली.

दवाखान्याच्या इमारतीची गैरसोय दूर करण्यासाठी नगरपालिकेने १९२८-२९ साली १२,६२२-१०-३ रु. खर्च करुन दवाखान्याची मुख्य इमारत बांधली[५].

१९३०-३१ साली दवाखान्याच्या मुख्य इमारतीलगत स्त्री व पुरुष पेशंटसाठी दोन स्वतंत्र वॉर्डस बांधले. त्यापैकी एका भागात स्नानगृह व दुस-यात ऑपरेशन रुमची व्यवस्था केली. या कामासाठी १३,६७०-५-३ रु. खर्च आला.

१९३१-३२ साली दवाखान्याच्या मुख्य इमारतीलगत नोकर वर्गास राहण्यासाठी क्वॉर्टर्स बांधल्या. त्यासाठी ६,६२८-१५-९ आणि १९३५ साली दवाखान्यात सूतिकागृहाची इमारत बांधून दोन बेड्सची सोय केली.

नगरपालिकेच्या दवाखान्यातील मेडिकल ऑफिसर सरकारमार्फत नेमला जातो आणि तो दवाचान्याचा इनचार्ज म्हणून काम पाहतो. दवाखान्यातील बाकीच्या नोकर वर्गाची नेमणूक नगरपालिकेकडून होते. मेडिकल ऑफिसर शिवाय दोन कंपौंडर्स, ड्रेसर, दोन वॉर्ड बॉय आणि झाडुवाला इ. नोकरवर्ग १९५५ साली होता.

नगरपालिकेच्या दवाखान्यात १९५५ साली सुमारे दहा हजार रोग्यांना औषधोपचार केला जाई. १९४० सालापासून दवाखान्यात येणा-या रोग्यांवर

नगरपालिकेने अल्प प्रमाणात फी बसवलेली होती. तथापि नगरपालिका हद्दीतील गरीब लोकांना मोफत औषधोपचार केला जाई.

मेडिकल ऑफिसरच्या पगारापैकी काही भाग फक्त नगरपालिकेस सरकारकडून ग्रॅन्ट म्हणून मिळतो दवाखान्याचा बाकी खर्च नगरपालिका करते.

नगरपालिकेस दवाखान्यावर दरसाल २०,००० पर्यंत खर्च करावा लागतो. नगरपालिकेच्या दवाखान्याचा इनचार्ज म्हणून सरकारी मेडिकल ऑफिसराऐवजी स्वतःचा मेडिकल ऑफिसर नेमण्याची परवानगी नगरपालिकेने सरकारकडून मिळविलेली होती.

**साथीचे रोग -**

कराड नगरपालिकेने खालील साथीच्या रोगांना योग्य ती प्रतिबंधक व्यवस्था करुन यशस्वीरित्या तोंड दिले.

**प्लेग -**

सन १६८९ मध्ये औरंगजेबाच्या काळात प्लेगची साथ पासली होती असा ऐतिहासिक पुरावा आहे. सन १६८९ मध्ये विजापूर येथे प्लेगने थैमान घातले होते. त्याला औरंगजेबाने यशस्वी तोंड देऊन त्याच्यावर उपाययोजना करणेचा प्रयत्न केला. त्या काळात हजारो माणसे प्लेगच्या साथीने मेली[५].

कराड शहरात व आसपासच्या गावात सन १८५९ साली मोठया प्रमाणात प्लेग साथ सुरु झाली[६]. तेव्हा सातारा शिवाय कोठेही औषधोपचाराची सोय नव्हती. तेव्हा नगरपालिकेने सातारहून डॉ. बाबूराय इच्छाराम यांना आणून शक्य ते प्रयत्न केले.

त्यानंतर १८७५ ते ७७ या काळात शहरात साथीचा उपद्रव ब-याच प्रमाणात झाला. ही साथ आटोक्यात आणण्यासाठी नगरपालिकेच्या दवाखान्यातील नोकर वर्गाने जिवापाड मेहनत घेतली नगरपालिकेकडून त्यांना बक्षीस म्हणून ७० रु. दिले.

१८९७ साली गाठीच्या प्लेगाने शहरास भेट दिली[८]. या साथीस ५ जुलै १८९७ ला सुरुवात होऊन तिने सहा महिने अमानुष धुमाकूळ घातला. या सहा महिन्यात प्लेगाची लागण संख्या १४६७ झाली. त्यापैकी १११७ लोक मृत्यु पावले[९]. कमालीची घबरहाट निर्माण झाल्याने असंख्य लोक घरदार सोडून गेले. मृतदेह हलविण्यासाठी चार स्वतंत्र नोकर व बैलगाडयांची सोय करण्यात आली.

त्यानंतर १९१५ पासून १९१८ पर्यंत चार वर्षे शहरात प्लेगाच्या साथीने ठाण मांडले. या काळात ७८९ लोक मृत्यु पावले[१०].

सन १९२४-२५-२६ या तीन वर्षात शहरात प्लेगाचा मोठया प्रमाणात उपद्रव झाला. १९२५ साली प्लेगची पहिली लागण रविवार पेठेत झाली व नंतर संपूर्ण गावभर पसरली. पुढे १९२७ ते १९२९ पर्यंत शहरात साथ टिकून राहिली. सन १९२९ ते १९४९ पर्यंत शहरात प्लेगच्या साथीने थैमान घातले[११].

सन १८८४ ते १९४९ मध्ये प्लेगने मृत्यु पावलेल्या लोकांची संख्या दर्शविणारा तक्ता[१२].

तक्ता क्र. १

| अ.नं. | सन | मृत्यु संख्या |
|---|---|---|
| १. | १८८४ | २१८ |
| २. | १८९७-१८९९ | १९२५ |
| ३. | १९००-१९०४ | १२२५ |
| ४. | १९०५-१९०७ | ६३८ |
| ५. | १९१६-१९१८ | ४३४ |
| ६. | १९१९-१९२३ | ८११ |

| अ.नं. | सन | मृत्यु संख्या |
|---|---|---|
| ७. | १९२४-१९२८ | ८५१ |
| ८. | १९२९-१९३३ | ११८ |
| ९. | १९३४-१९३८ | १३५८ |
| १०. | १९३९-१९४३ | १६४५ |
| ११. | १९४४-१९४९ | २९१६ |

**प्लेग निर्मुलनासाठी केलेले उपाय -**

सन १८९७-९८-९९ साली उद्भवलेल्या प्लेगच्या साथीचे निर्मुलन करणेसाठी कराड नगरपालिकेने खालील प्रतिबंधक योजना केली व प्लेगच्या साथींना आळा घालण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न कसोशीने केले.

१. मामलेदार कचेरीच्या पिछाडीस लागण झालेल्या लोकांसाठी दहा झोपडया बांधल्या.

२. रोग्यांची शुश्रुषासाठी खास सॅनिटरी कँप मागविण्यात आला.

३. प्रेते हलविण्यासाठी चार स्वतंत्र नोकर व बैलगाडयांची सोय करण्यात आली.

४. शहरात स्वच्छता राखण्यासाठी जादा पोलिस मागविण्यात आले.

५. गाव सोडून गेलेल्या लोकांच्या घराची राखण करण्यासाठी रखवालदार नेमण्यात आले.

६. या व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठी खास मामलेदाराची नेमणूक करण्यात आली.

या शिवाय नगरपालिकेचे सभासद श्री भागवत यांनी खुप परिश्रम घेतले.

सन १९४८ प्लेगाची वाढती संख्या लक्षात घेऊन नगरपालिकेने योग्य त्या अधिकारी वर्गाची नेमणूक केली. अनेक कर्मचारी दिले. प्लेग निवारणासाठी औषधे पुरविली, घरोघरी सायनोगॅसिंग करणे व उंदीर मारणे या मार्गांनी प्लेग साथ आटोक्यात आणली. घरोघरी प्रतिबंधक लस टोचली. १९२८-२९ साली प्लेग साथीत ७००० लोकांना प्लेग प्रतिबंधक लस टोचली[13]. उंदीर पकडण्यासाठी १९७२-७३ साली १०० नग सापळे खरेदी केले, उंदीर मारणेचे औषध फुकट पुरविले.

प्लेग निर्मुलनासाठी घरे निरजंतुक करणे गरजेचे असल्याने सियानो गॅसची धुरी दिली. पाठीवरील पंपाच्या साहय्याने डी.डी.टी. पावडर फवारुन घरे निर्जंतुक केली.

नगरपालिकेने प्लेगाचा बंदोबस्त करण्यासाठी प्लेग प्रतिबंधात्मक लस टोचणे व उंदीर मारणे यासाठी नगरपालिका बजेटमधून काही रक्कम खर्च केली. १८९७-९८ व १८९९ साली उद्‌भवलेल्या साथीचे निर्मुलन करणेसाठी नगरपालिकेने स्वतंत्रपणे ५०३-१४ रु. खर्च केले. शिवाय सरकारमार्फत झालेल्या २४००० खर्च रक्कमची मागणी सरकारने नगरपालिकेकडे केली. त्या रक्कमेपैकी १५,००० रक्कम नगरपालिकेस मदत समजून बाकी रक्कम ११,००० नगरपालिकने पाच वर्षात हप्त्याहप्त्याने फेडली. प्लेगाची साथ आटोक्यात आणण्यासाठी उंदीर पकडणे कामी नगरपालिकेने १९७८-७९ साली २००० रु. सापळे खरेदी केले[14].

सन १९८०-८१ साली २००० व १९८७-८८ व १९९२-९३ साली १००० रु. सापळे खरेदी केले[15]. म्हणजेच साथ येण्या अगोदरच तीचा बंदोबस्त करण्याता आला. त्यामुळे साथीला आळा बसला.

**कॉलरा -**

कराड शहरातील नागरिकांना आणखी एका भयानक साथीस तोंड द्यावे लागले ती म्हणजे कॉलरा. सन १८५९ व १८८५ सालाच्या मध्यास शहरात मोठया प्रमाणात

कॉलराची साथ सुरु झाली. त्याकाळी प्रतिबंधक साधने फारशी उपलब्ध नव्हती. तरीही साथीस आळा बसावा म्हणून मॅनेजिंग कमेटीने ता. २२-७-१८८५ रोजी ठराव केला[१६] तो पुढील प्रमाणे -

गावात कॉलरा साथ सुरु असल्याने प्रतिबंधक उपाय योजावेत-

१. दररोज प्रत्येक आळीत गंधक आणि डांबर जाळावे.

२. नगरपालिकेच्या मेंबरानी प्रत्येक कामावर लक्ष ठेवावे.

३. घरातून स्वच्छता राखण्याची खबरदारी घ्यावी.

४. रस्त्यांची व गटारांची स्वच्छता ठेवावी.

५. पाण्याचे हौद स्वच्छ ठेवावे.

सदर उपाययोजनेसाठी नगरपालिकेने ६७ रु. खर्च केला.

सन १८९७ ते १९०७ सालापर्यंत कॉलरा साथ लागोपाठ आल्या. ४ मे, १९४१ पासून कॉलरा साथ सुरु झाली. यावेळी १०५ जणांना लागण झाली. २६ लोक मरण पावले. नगरपालिकेने तातडीने उपाययोजना केल्यामुळे एक महिन्याच्या आत साथ आटोक्यात आली.त्यानंतर १९४५ साली साथ उद्भवली यावेळी १०० लोक मृत्यु पावले[१७].

सन १८८७ ते १९४५ साली कॉलरा साथीने मृत्यु पावलेल्यांची संख्या दर्शविणारा तक्ता[१८].

तक्ता क्र.२

| अ.नं. | सन | मृत्यु संख्या |
|---|---|---|
| १. | १८९७-१९०० | ५२३ |
| २. | १९०१-१९०४ | १०१ |
| ३. | १९०५-१९०७ | १६८ |
| ४. | १९४१ | २६ |
| ५. | १९४५ | १०० |

सन १९६३-६४ साली पुन्हा कॉलरा साथ उद्‌भवलेली दिसते[१९]. सन १८९७-१९०० या काळात कॉलरा साथीत मृत्यु पावलेल्या लोकांच्या संख्येचे प्रमाण जास्त दिसते. त्यांनतर मात्र ते हळूहळू कमी होत आले आहे. कारण कराड नगरपालिकेने शहराची पाणीपुरवठा योजना १९१८ च्या दरम्यान तयार केली. सन १९७८ साली त्यात सुधारणा केल्या. १९९२ पासून कराड शहरास १८ दशलक्ष लिटर्स शुध्द व स्वच्छ पाणीपुरवठा केल्याने कॉलरा साथीस आळा बसला[२०].

**कॉलरा प्रतिबंधक उपाय योजना -**

कराड नगरपालिकेने १८८५ पासूनच कॉलरा प्रतिबंधक उपाय योजना आंमलात आणलेल्या दिसतात. या काळात प्रत्येक आळीत गंधक, डांबर जाळले. घरांची, रस्त्यांची, गटारांची स्वच्छता ठेवली, पाण्याचे हौद स्वच्छ ठेवले.

नंतरच्या कालखंडात मात्र प्रतिबंधक औषधाचा वापर नगरपालिकेने केला. आफिस रिपोर्ट व जिल्हा आरोग्य अधिकारी सातारा जिल्हा परिषद यांनी वैद्यकिय अधिकारी कराड कुटीर रुग्णालय यांना पाठविलेली पत्राची जा.नं.

डि.एच.ओ.सी.सी.टी. ९४२/७८ १९७८ ची प्रत पाहिली. त्यानुसार कॉलरा प्रतिबंधक लस मागविण्यात आल्या. तसेच हाफकीन इन्स्टिटयुट-मुंबई ७००० डोसेस लस मागविली[२१].

१९७१-७२ साली हाफकिन इन्स्टिटयुट परेल मुंबई यांच्याकडून कॉलरा प्रतिबंधक लस मागविल्या. त्याचे बील ३८५ रु. आले[२२]. १९८०-८१ साली २००० डोसेस खरेदी केले[२३].

१९५२-५३ साली ५००० अेसम औषध बील ३५१ रु. आले[२४].

१९६६-६७ साली कॉलरा साथीस आळा घालण्यासाठी

| | | |
|---|---|---|
| कॉलरा व्हॅकसीन | - | २५००० |
| हायपर टॉनिक सलाईन | - | २५ टयूब्ज |
| **केओलिन** | - | **५ किलो** |
| डेकॅट्रीन | - | २० बल्ब |
| आयोडीन | - | १५ पौंड |
| पोटॅशिअम | - | १ पौंड |
| मेथेलेटेड स्पिरिट | - | ६ बाटल्या |

आणल्या गेल्या. या कामी सन १९६६-६७ साली पब्लीक हेल्थ कमिटीने ठराव करुन शहरात आयसोलेशन वॉर्ड उघडून रोग्यांची सोय केली. मदतनीस नोकर नेमले त्यासाठी २ डॉक्टर, ३ दायी, २ भंगी, २ वॉर्ड बॉईज नेमले. या कामासाठी पालिकेस एकूण ७,५२१-९० खर्च आला[२५]. १९६४ कॉलरा साथीत डॉ. के. वाय. देशपांडे, डॉ. एम.एम. वाचासुंदर यांनी महत्वाची भूमिका पार पाडली[२६].

अशा प्रकारे कॉलरा प्रतिबंधात्मक उपाययोजने बाबतीत कराड नगरपालिकेने शहर स्वच्छता मोहिम हाती घेतली. विशेषतः सार्वजनिक पाणीच्या ठिकाणी डी.डी.टी. पावडर टाकून निर्जतुक करणेत आली. तसेच मटण मार्केट, मासळी बाजार या ठिकाणी स्वच्छतेच्या दृष्टीने दक्षता घेतली. तसेच शहराला शुध्द व स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा या दृष्टीने वाटचाल चालू झाली. परिणामी कॉलरावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात मदत झाली.

**देवी/कांजणी -**

प्लेग, कॉलरा या साथीच्या रोगाबरोबर कराड नगरपालिकेला आणखी एका साथीच्या रोगाला तोंड दयावे लागले. ती म्हणजे देवी किंवा कांजणी होय. देवीच्या साथीवर प्रतिबंधक उपाय करण्यासाठी १८६४ साली नारायण भाऊ यांची व्हॅक्सीनेटर म्हणून नियुक्ती केली[२७].

देवीच्या या भंयकर साथीने १९६५ साली या रोगाने थैमान घातले[२८]. त्यानंतर १९६६-६७ साली[२९], १९६८-६९ व १९७५-७६ साली पुन्हा ही साथ उद्‌भवली तेव्हा कराड नगरपालिकेने इतर साथीत जशी उपाययोजना केली तशीच या साथीत उपाययोजना करुन ही साथ आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला[३०]. १९६८-६९ साली आलेल्या साथीस ६-७-१९६८ रोजी सुरुवात झाली. यात ९ लोकांना लागण होऊन एक जण मृत्यु पावला.[३१]

**लस टोचणी कार्यक्रम -**

देवी निर्मुलन योजनेसाठी कराड नगरपालिकेने विशिष्ट कार्यक्रम राबविला. मुलांना मोफत दिले जाणारे इंजेक्शन्स, डोसेस याची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवली. नगरपालिकेने लस टोचणी कार्यक्रम नियोजनबध्द आखून रोगावर नियंत्रण प्रस्थापित

करणेचा यशस्वी प्रयत्न केला. रोग होण्याआधीच रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या. लस टोचणी संबंधी टेंपररी नोकर वर्ग नेमला. १९६६-६७ साली १९४ लोकांना देवी प्रतिबंधक लस टोचली. १९६६-६७ साली देवी साथीवर प्रतिबंधक उपाय खर्च ३,३५,८७५ रु. इतका आला[३२]. १९६८-६९ साली आलेल्या साथीत ४२०० लोकांना लस टोचली[३३].

**इतर साथी -**

गॅस्ट्रो, इन्फ्लूंझा या सारख्या साथीच्या वेळी कराड नगरपालिकेने प्रतिबंधक उपाय योजले. साथीच्या वेळी सॅनिग्रेशन कॅम्प, लोकल बोर्ड, धर्मशाळेत व इतर ठिकाणी उघडले. १९५७ साली आलेल्या इन्फलूंझा साथीत खालील प्रमाणे प्रतिबंधक उपाय योजले.

१. रोग्यांना औषधे व इंजेक्शन देणेकरिता म्युनिसिपल दवाखान्यात एक व इतर दोन - तीन उपचार केंद्रे उघडली, त्यावर दोन डॉक्टरांची नेमणूक केली. याशिवाय मेडिकल असोसिएशन तर्फे डॉक्टर येऊन सदर केंद्रावर रोज एक तास हजर राहून विनामूल्य उपचार करत असे. सदर साथीत एकूण ६५५० फ्ल्यूचे रोग्यांना या केंद्रामार्फत मोफत औषध उपचार दिला. औषधाकरिता एकूण ४६७.७०-६ आणे खर्च आला[३४].

२. सदर खात्यावर रोगींना आणण्यासाठी दोन मोटारी दिल्या.

३. सदर केंद्रावर डॉक्टर, कंपॉऊंडर्स, वॉर्ड बॉईज, नोकर नेमले.

४. अती आजारी रोग्यास, सेनिग्रेशन वॉर्ड उघडला. अथरुण-पांघरुण, खाद्य पेय दिले.

सर्व नोकर वर्गाकरिता १८८०-४३ नये पैसे खर्च आला. सेनिग्रेशन वॉर्ड मध्ये २१६ रोगी बरे होऊन गेले[३५].

१९६४ च्या साथीत एकूण ८८८६.६७ नये पैसे खर्च झाला. या साथीत सन्माननीय प्रॅक्टीस करणारे डॉक्टर मे. डांगे, मे. थोरवडे व नगराध्यक्ष पी.डी.पाटील, दवाखाना स्टाफ, चीफ ऑफीसर यांनी अहोरात्र सेवा केली[३६].

**नागरी कुटुंब कल्याण -**

कराड शहरातील सुरुवातीच्या कालखंडातील लोकसंख्या पाहिली असता सतत वाढत जाणा-या लोकसंख्येला आळा घालणे गरजेचे आहे. तसेच छोटे कुटुंब सुखी कुटुंब याची जाणीव लोकांना करुन देण्यासाठी कराड नगरपालिकेने आवश्यक ते प्रयत्न केलेले आहेत व करत आहेत.

६/३९ कराड शहरात कुटुंब नियोजन केंद्र सुरु करणे बाबत ज.क.ठ.नं.५४८ तसेच सदर केंद्राबाबात मे. स.क.ठ.नं.३/८८ ता.१४-८-५८ ने आलेल्या शिफारशी पाहिल्या. सदरच्या शिफारशीस अनुसरुन म्युनिसिपल दवाखान्यात कुटुंब नियोजन केंद्र ता. १-९-५८ पासून सुरु करणेस मंजुरी देणेत आली. सरकारकडून १००% अनुदान मिळाले[३७].

कुटुंब नियोजन मा. डेप्युटी डायरेक्टर ऑफ हेल्थ सर्व्हिसेस, कोल्हापूर यांचे पत्र व ऑफिस रिपोर्ट पाहिला. कुटुंब नियोजनासाठी कार्यक्रम आखणे वर्षातून २ ते ३ वेळा कुटुंब कल्याण मोहिम सुरु ठेवणे, त्यासाठी पुढील प्रमाणे कार्य पार पाडले -

१. कुटुंब कल्याण मोहिमेसाठी शस्त्रक्रिया आदि बाबत जाहिरात काढणे, बोर्ड लावणे, कापडी घोषणा फलक लावणे.

२. शस्त्रक्रियेसाठी सहकार्य कॉटेज हॉस्पिटल व खाजगी शस्त्रक्रियाची सोय उपलब्ध असलेल्या शहरातील डॉक्टरांचे सहकार्य घेणेत यावे. या कामी होणारा औषधपाणी खर्च नगरपालिकेने द्यावा.

३. शस्त्रक्रिया करुन घेणा-या स्त्री-पुरुषास शासनाकडून मिळणा-या रक्कमेखेरीज नगरपालिकेने अनुदान द्यावे.

४. शस्त्रक्रिया करुन घेणा-यास पोहचविणे किंवा वाहन खर्च दयावा.

५. शिक्षण मंडळातील शिक्षक-शिक्षकांची या कामी घरोघरी प्रचार करणेसाठी सहकार्य घ्यावे[३८].

कुटुंब कल्याण मोहिम राबविणेसाठी नगरपालिकेने कुटुंब नियोजन राष्ट्रीय कार्यात सामील व्हा या संबंधी जाहिरात दैनिक जिन्हाळा मध्ये १९-७-१९८२ साली प्रसिध्द केली.[३९]

सॅ. इन्स्पेक्टर रिपोर्ट व मा. वैद्यकिय अधिकारी, कुटीर रुग्णालय, कराड यांचे पत्र ४११८ नुसार कुटुंब नियोजन मोहिमेतील एक भाग म्हणून कॉपर टी बसवून घेणा-या स्त्रीस नगरपालिकेने २० रु. अनुदान दिले. तसेच कुटुंब नियोजन मोहीम यशस्वी करण्यासाठी न. पा. शिक्षकांना न.पा. तर्फे नसबंदी करुन घेण्यास प्रवृत्त करणेबाबत पारितोषिके दिली. १०० केस - १००० रु. बक्षीस, ७५ केस- ७५० रु. बक्षीस, ५० -५०० रु. बक्षीसे दिली. कुटुंब कल्याण मोहिमेसाठी मोफत लेप्रेस्कोपिक कुटुंब नियोजन स्त्री शस्त्रक्रिया शिबीर १९८१-८२ साली आयोजित केले[४०].

सन १९८३-८४ साली कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करुन घेणा-या पुरुषास ३०० रु. स्त्रीस १९० रु. व प्रवृत्त करणा-यास ४५ रु. दिले. तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रम उद्दिष्ट ठरवून दिले. सन १९८३-८४ या सालासाठी ७३४ चे उद्दिष्ट होते.

मात्र १५९४ केसेस करुन दुप्पटीपेक्षा जास्त उद्दिष्ट साधल्याने कराडचे कुटुंब कल्याण चे काम जिल्यामध्ये नव्हे तर महाराष्ट्रात कौतुक होण्यासारखे झाले[४१].

मा. जिल्हाधिकारीसो, सातारा यांनी कुटुंब कल्याण ॲक्टन प्लॅन संबंधी दि. १४-८-८४ आयोजित केलेल्या मिटिंग मध्ये उद्दिष्ट २०० होते. पण प्रत्यक्ष कामाचा आढावा घेतल्यास काम अगदी अल्प होते. या कामास गती यावी म्हणून नगरपालिकेने १-८-८४ ते १४-८-८४ अखेर १२५ अनुदान केले पुढे ते १५० करुन नगरपालिकेने दोन महिन्यात ६०० केसेस सर्व सेवकांना २ केसेसचे उद्दिष्ट दिले. नगरपालिकेने कुटुंब नियोजन कार्यक्रमात सतत दक्षता घेतलेली दिसून येते. १९८४ साली मोफत नसबंदी शिबीर आयोजित केले[४२].

१९७४ साली गोळया खरेदीसाठी १५० रु. व कुटुंब नियोजन कामाकरिता २००० रु. खर्च आला. कुटुंब नियोजन केंद्राकरिता,सल्फाडायझीन गोळया, डेटॉल सिबेझॉल पावडर, इखोलीन गोळया, A.P.C. गोळया, कॅल्शिअम लॅक्टेड गोळया, कॉटन बंडल, गॉज बंडल इ. साहित्य खरेदी केले[४३].

तसेच केंद्रामार्फत मोफत गर्भनिरोधक गोळया, तांबी इ. साहित्य पुरविले जाई.

२० कलमी राष्ट्रीय कार्यातील कुटुंब नियोजन कार्यात नगरपरिषदेने लक्षणीय कामगिरी बजावली[४४].

१९६७-६८ साली कुटुंब नियोजन कार्यक्रम राबवित असताना ९०० स्त्री पुरुषांनी शस्त्रक्रिया करुन घेतली. १२०० लोकांनी संतती प्रतिबंधक साधने वापरली[४५].

तर १९८३-८४ साली ७३४ या सरकारी उद्दिष्टापेक्षा दुप्पट म्हणजे १५९४ केसेस उद्दिष्ट नगरपालिकेने साधले. १९८४ साली ६०० केससचे उद्दिष्ट साधले व कुटुंब नियोजन प्रक्रियेतील महत्वाचा टप्पा पार पाडला[४६].

**कुटुंब नियोजन खर्च -**

नगरपालिकेकडून कुटुंब नियोजन कार्यक्रम राबविताना नोकर पगार, औषधोपचार व इतर खर्च, शस्त्रक्रियेबद्दल नगदी पुरस्कार दिला जातो. या सर्व गोष्टीसाठी नगरपालिकेने अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते. नगरपालिकेकडून १९७२ ते १९९३ पर्यंत कुटुंब नियोजनाकरिता केलेल्या खर्चाचा तक्ता [४७].

**तक्ता क्र.३**

| अ.नं. | सन | खर्च |
|---|---|---|
| १. | १९७३-७४ | १६,५८१ |
| २. | १९७४-७५ | १९,९२२ |
| ३. | १९७५-७६ | १७,९९० |
| ४. | १९७६-७७ | १७,३५६ |
| ५. | १९७७-७८ | ४,८३८ |
| ६. | १९७८-७९ | २७० |
| ७. | १९८०.८१ | १,५०० |
| ८. | १९८१-८२ | २८,६३६ |
| ९. | १९८२-८३ | ८५,४३६ |
| १०. | १९८३-८४ | ३,८०,४६६ |
| ११. | १९८४-८५ | १,००,००० |
| १२. | १९८५-८६ | १,१५,००० |
| १३. | १९८६-८७ | ११,००० |
| १४. | १९८७-८८ | २,५०,००० |
| १५. | १९९०-९१ | - |
| १६. | १९९१-९२ | ४५० |
| १७. | १९९२-९३ | १,५०० |

**माता बाल संगोपन -**

नगरपालिकेने नागरी आरोग्य सेवा योजने तर्फे चालविला जाणारा आणखी एक महत्वाच उपक्रम म्हणजे माता बाल संगोपन हा होय.

चिल्ड्रन वेल्फेअर सोसायटीचे ऑ. सेक्रेटरी डॉ. के.एस.म्हसकर यांच्या सल्ल्यानुसार ता. १-११-१९५१ रोजी 'बालसंगोपन केंद्र' उघडण्यात येऊन त्या ठिकाणी बालकांना विनामूल्य औषधोपचार करण्यासाठी व दुध वाटण्यासाठी हेल्थ व्हिजीटर नि दाई यांची नेमणूक करण्यात आली. या योजने अंतर्गत मातांची नोंदणी केली जाते. त्यांचे प्रबोधन केले जाते. त्यांना आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. तसेच बालकाची नोंदणी केली जाते. या मुलांना पोलिओ डोस, ट्रिपल, बी.सी.जी.गोवर, डी.टी.अ जीवनसत्व, फॉलिक ॲल्डिच्या गोळया इ. दिल्या जातात. बालसंगोपन केंद्रास गहू, दूध, साखर पुरविली जाते[४८].

१९५५-५६ साली माता बालसंगोपन हेल्थ व्हिजीटर, श्रीमती गोखले नंतर ते कराड महिला मंडळाकडे दिले[४९].

१९५२-५३ साली बालसंगोपन केंद्र श्री डॉ. के.एस.म्हसकर यांच्या देखरेखीखाली देण्यात आले[५०].

नगरपालिकेच्या स्त्री कामगारांच्या लहान मुलांचे संगोपन करण्यासाठी लहान मुलांचे सार्वजनिक संगोपन केंद्र स्थापन करणे बद्दल सरकारी पत्र क्र. सी.ओ.एम./२६८ध५१ डी ४३-अे दि. ६-११-१९६८ पत्र व रिपोर्ट पाहिला[५१].

**कुष्ठरोग प्रतिबंधात्मक उपाय -**

कराड नगरपालिकेने कुष्ठरोग प्रतिबंधात्मक उपाय योजनेसाठी स्वतंत्र विभागाची स्थापना करुन कुष्ठरोग पिडीत लोकांची सेवा करण्यास प्रारंभ केला.

नगरपालिकेच्या हेल्थ ऑफिसरच्या नियंत्रणाखाली या विभागाचे काम पाहिले जाते. कराड नगरपालिकेने रि.स.नं. १४/१ क्षे २३ मशिद येथे महारोगी तपासणी करिता व औषधोपचारकरिता शेड बांधली होती.[५२]

मा. जिल्हा आरोग्य खाते यांचे पत्र क्र. L.P. Arit Lep day/ we etc/२१७४/१९८२ दि. २२-१-१९८२ चे पत्र अनुसार सॅ. इन्स्पेक्टर रिपोर्ट प्रामणे 'जागतिक कृष्ठरोग निदान दिन' कराड नगरपालिका तर्फे ५-१२-१९८२ अखेर साजरा केला[५३].

**हिवताप (मलेरिया) -**

मलेरियाचा प्रसार प्रामुख्याने डासापासून होतो. तेव्हा डासाचे निर्मुलन करणेसाठी प्रत्येक वार्डातील पाणी साठणा-या डबके, खड्डे, उकिरडे या ठिकाणी मलेरिया बी ऑईल टाकले. शहरातील सार्वजनिक संडास, मुता-या, घाण, गटारे, कचरा-कोंडाळी अशा ठिकाणी व दलदलीच्या ठिकाणी रोग प्रतिबंधक जंतुनाशके औषधाची फवारणी केली जाते. मा. सहसंचालक आरोग्य सेवा पुणे १ यांचे दि. १०-५-१९८५ चे पत्रानुसार साथीचे रोग उद्‌भवू नयेत म्हणून लायसोटॉल आर.डब्लू. सी १८/२० ब्लॅक, गॅमेक्झीन पावडर बी एस १०% मुतारी स्वच्छ करणेसाठी फिनेल, हायड्रोक्लोरिक आम्ल याचा वापर केला जातो. डासांसाठी बीटेक्स १०००, अॅबेठ ५० एसी नुबॉन मलेरिया ऑईल इ. वापर केला जातो[५४].

नगरपालिकेने डासांचा नाश करणेसाठी उपयोगी पडणारे फॉग जनरेटिंग मशीन नग १ मे. विनित इंजिनिअरिंग कंपनी पुणे यांचेकडून खरेदी केले. तसेच मलेरियाला आळा घालणेसाठी म्युनिसिपल हद्दीतील घरे डी.डी.टी व डायझीनने धुवून घेतली जातात[५५].

पुणे यांचेकडील मलेरिया प्रतिबंधक उपयोयोजनेचे कामी को. ऑर्डीनेशन कमेटी नेमणूक बाबतचे पत्र क्रं. F-३० जी. ई. एन टी दि. ३१-३-१९७१ नुसार कमेटीत -

१. मे. प्रेसिडेंट नगरपालिका - चेअरमन

२. मे. चेअरमन आरोग्य समिती

३. मेडिकल ऑफिसर

४. प्रे. इंडियन मेडिकल असोसिएशन शाखा कराड

५. मे. जिल्हा मलेरिया ऑफिसर

६. मे. इंजिनिअर वॉटर सप्लाय व ड्रेनेज, कराड

यांचा समावेश केला होता[५६].

डिस्ट्रिक्ट मलेरिया ऑफीसर श्री वा.र.फडके यांनी कराड शहरातील लोकांना मलेरिया निर्मुलनासाठी आवश्यक ती माहिती सांगितली. या योजनेसाठी ८ बिगारी कामगार व २ मुकादम नेमले व शहर स्वच्छतेच्या दृष्टीने योग्य ते लक्ष दिले[५७].

नगरपालिकेने १९८८-८९ साली डास प्रतिबंधक औषधे फवारणीसाठी दोन फँगींग मशीन खरेदी केली व आरोग्य विभागामार्फत शहरात रोजचे रोज स्प्रे पंपाचा वापर करुन जंतुनाशक औषध फवारणी केली जाते[५८].

**जागतिक आरोग्य दिन -**

'वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन' या जागतिक संघटनेच्या आदेशानुसार कराड नगरपालिकेने १९५० सालापासून प्रतिवर्षी ७ एप्रिल हा जागतिक आरोग्य दिन म्हणून

साजरा करण्यास सुरुवात केली. या दिवशी संपूर्ण शहरात सार्वत्रिक स्वच्छतेचे कार्यक्रम होतात नि सुदृढ व निरोगी बालकांना बक्षिसे वाटली जातात[५९].

**कॉटेज हॉस्पिटल/कुटिर रुग्णालय -**

कराड नगरपालिकेने आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची पाऊले उचलली त्याची प्रचिती तिने पार पाडलेल्या कार्यावरुन दिसून येते. कराड नगरपालिकेने १८६५ साली नगरपालिकेचा स्वतंत्र दवाखाना सुरु केला. १८६५ ते १९६० पर्यंत नगरपालिकेने नागरिकांच्या आरोग्याची अविरत सेवा केली. अनेक मोठया साथीच्या वेळी कसोशीने प्रयत्न करुन साथींना प्रतिबंधात्मक असे उपाय योजले. लोकांना आरोग्याच्या अनेक सवलती उपलब्ध करुन दिल्या.

पण नंतर आरोग्याची जबाबदारी कॉटेज हॉस्पिटल बांधून त्यांच्यावर सोपवली व म्युनिसिपल दवाखान्याची सुरुवातीची इमारत व जागा विकून येईल तेवढी सर्व रक्कम कॉटेज हॉस्पिटलच्या इमारत खर्चासाठी नगरपालिकेची एकूण कॉन्ट्रीब्युशन म्हणून देण्यास नगरपालिका तयार झाली[६०].

कराड येथे बांधावयाच्या कॉटेज हॉस्पिटल साईट संबंधीचे एक्झीक्युटिव्ह इंजिनिअर, उ. सातारा यांचे कडील नं.टी/४९२१ ता. १६-३-१९५८ ची नोट व मे डेप्युटी इंजिनिअर कराड सब डिव्हिजन यांचे कडील नं. के/१३७/२०७३ ता. ७-६-१९५८ चे पत्र सोबत आणलेला साईट प्लॅन आणि म्युनिसिपल ऑफिसने तयर केलेला साईट प्लॅन इ. कागदपत्रे पाहिली. कॉटेज हॉस्पिटलच्या इमारतीसाठी रि. रु. ७७७८७९ (भाग ८०-८१-८२) म्युनिसिपल साईट प्लॅन मध्ये दाखविल्याप्रमाणे अंदाजे ८ एकर २२ गुंठे जागेस संमती दिली[६१].

कराड नगरपालिकेच्या ता. १९-५-१९५८ च्या सभेमध्ये ठराव नं. २/१५ ने मंजूर झाला. जा.क.ठ.नं.-२/१५ मे सर्जन जनरल मुंबई राज्याचे न एस/१६४ /१५२४३/एम ता. २०-१-१९५८ चे पत्र पाहिले. सदर पत्रात म्युनिसिपल दवाखान्याची सध्याची इमारत व जागा विकून सर्व रक्कम कॉटेज हॉस्पिटलच्या इमारत खर्चासाठी नगरपालिकेची कॉन्ट्रिब्युशन म्हणून दिली व नगरपालिका सध्या म्युनिसिपल दवाखान्यावर जेवढी रक्कम दरसाल खर्च करते तेवढी रक्कम कॉटेज हॉस्पिटलचे मेंटेनन्ससाठी देत राहिल[६२].

कॉटेज हॉस्पिटलच्या लौकिकाच्या व उपयुक्ततेच्या दृष्टीने स्थिती बरोबर नसल्याने मेडिकल ऑफिसर डॉ. सावंत यांची कराड कॉटेज हॉस्पिटलमधून बदली केली[६३].

सन १९६० पासून शासकीय कुटीर रुग्णालय कराडमध्ये सुरु झाले. त्यामुळे नागरिकांच्या वैद्यकीय सेवेत मुलभुत सुधारणा झाल्या. कुटीर रुग्णालयास नगरपालिका वार्षिक अनुदान देते.

कुटीर रुग्णालय, कराड यांचे कडील पत्र नं. कॉटेज/हॉस्पिटल/८३६ ऑफ ८० आ. नं. ८३९० दि. २५-३-१९८० पत्रानुसार नगरपालिकेने १५,२२० रु. वर्गणी कॉटेज हॉस्पिटलला दिली[६४].

कराड म्युनिसिपल कॉन्सिलने ठराव नं. १०/८१ दि. १५-३-१९८० अन्वये कराड कॉटेज हॉस्पिटल विस्तार योजनेपोटी येणारे खर्चापैकी काही रक्कम रु. १०,००,००० कराड नागरिकांचे आरोग्याचे सेवेसाठी व हितासाठी म्हणून देणेचे मान्य केले. त्या प्रमाणे मे. सिव्हिल सर्जन सातारा यांनी शासनाकडे शिफारस केली[६५].

कॉटेज हॉस्पिटल स्थापन झालेपासून नगरपालिकेमार्फत प्रतिवर्षी वर्गणी दिली जाते. सन १९९३ साली कॉटेज हॉस्पिटल विस्तार व संसर्गजन्य हॉस्पिटलसाठी नगरपालिका वर्गणी ८,२१,००० रु. देण्यात आली[६६].

अशाप्रकारे नगरपालिका कॉटेज हॉस्पिटलला वार्षिक वर्गणी देऊन लोकांना वैद्यकीय सोयी सुविद्या पुरविते.

**दवाखाना खर्च -**

खालील तक्त्यावरुन नगरपालिकेने दवाखान्यावर केलेल्या खर्चाचा आढावा घेता येतो[६७].

तक्ता क्र. ४

| अ.नं. | सन | खर्च |
|---|---|---|
| १. | १९५४-५५ | २०००० |
| २. | १९५८-५९ | ४३,२२५ |
| ३. | १९६२-६३ | ८,६६,२७७ |
| ४. | १९६६-६७ | ११,५६,६४० |
| ५. | १९७२-७३ | १८,८८,३५२ |
| ६. | १९७७-७८ | ३,९९,०५७ |
| ७. | १९८३-८४ | ५,५५,९१९ |
| ८. | १९८७-८८ | १४,५२,१५९ |
| ९. | १९९०-९१ | १,७६,४६१ |
| १०. | १९९२-९३ | १८,३१,९३० |

**शहर स्वच्छता :**

केरकचरा गोळा करणे -

कराड नगरपालिकेने कोणत्याही प्रकारच्या साथी उद्‌भवू नये. यासाठी शहर स्वच्छतेला प्राधान्य दिले आहे हे आपणास नगरपालिका रेकॉर्डवरुन समजते. शहरातील केरकचरा व घाण गोळा करणेची व्यवस्था केली आहे. शहर स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी शहरात ठिकठिकाणी कचरा टाकणेसाठी कचरा पेटया ठेवणेत आल्या आहेत. सार्वजनिक रस्त्यावरील कचरा गोळा करणेसाठी कराड नगरपालिकेने स्वतंत्र २९२ झाडू कर्मचा-यांची नेमणूक केली आहे. या कामी आरोग्य विभागाकडील सॅनिटरी मुकादम मार्फत शहरातील सर्व साफसफाईचे काम करुन घेतले जाते. प्रत्येक वॉर्डमध्ये साफसफाई कामावर देखरेखीसाठी १ मुकादम नेमला जातो. त्याच्या मार्फत कामासंबंधी माहिती वरिष्ठांना दररोज सादर केली जाते.

अशाप्रकारे कराड नगरपालिकेने स्वच्छ सुंदर शहर ठेवणेचा यशस्वी प्रयत्न केला आहे[६८].

केरकचरा स्थलांतर -

कराड नगरपालिकेने कचरा स्थलांतराची उत्तम सोय केलेली आहे. १८९१ साली शहरातील निघालेला कचरा टाकण्यासाठी शहराच्या पूर्वेस एक एकर बत्तीस गुंठे जमीन १०० रु. खरेदी केली. त्याठिकाणी मैला टाकण्यासाठी बारा डबरे खणले. मैला वाहून नेण्याकरिता बैलगाडयाची व्यवस्था केली. प्रत्येक गाडीस दरमहा १५ रु. दिले.

शहराची वाढती लोकसंख्या व शहर विकास यामुळे आरोग्य सेवेची अधिकच मागणी होऊ लागली व शहरातील कचरा, गाळ व मैला वाहून नेणे अधिक सुलभ व्हावे म्हणून नगरपालिकेने १९४८ साली १, १९५०-१, १९५१-२ अशा चार

मोटारगाडया मिलटरी डिस्पोजल मधून खरेदी केल्या. त्यामुळे शहरातील घाण वाहून नेण्याचे काम अधिक व्यवस्थित व जलद गतीने होऊ लागले. जमा झालेला कचरा, मैला यापासून 'टाऊन कंपोस्ट खत' तयार करण्यात येऊ लागले[६९].

१९७४-७५ साली शहरातील कचरा वाहतुकीसाठी तीन चाकी टेंपो खरेदी केला[७०].

१९८१-८२ साली कचरा गोळा करणेसाठी ५ ट्रक्टर खरेदी केले व ३०० गॅलन क्षमतेचा मैला टँकर तयार केला[७१]. १९९३ मध्ये एकूण ५ ट्रॅक्टर कचरा वाहतुकीसाठी होते. यातून रस्त्याच्या वरील व कचरा कोंडाळीमध्ये साचलेल्या कच-याची वाहतूक केली जाते.

मैला व घाणीचे स्थलांतर -

आरोग्याच्या दृष्टीने केरकचरा मैला घाणीचे स्थलांतर करणे हे नगरपालिकेचे अतिशय महत्वाचे कार्य आहे. शहरातील मैला व घाण मैला, सफाई कामगार यांच्याकडून गोळा करुन ती गावाच्या पूर्व बाजूस खड्डे काढून टाकली जाते. यासाठी गाडया अथवा ट्रकचा वापर केला जातो. त्याच बरोबर फिरती संडास व्हॅनचा वापर केला जातो. १९५५ साली एक ट्रक्टर व तीन ट्रक या कामासाठी होते[७२].

कंपोस्ट खत -

शहरातील निघणारा मैला व कचरा यापासून 'टाऊन कंपोस्ट' खत तयार केले जाते. यासाठी गावाच्या पूर्व बाजूस ६ खड्डे काढले नंतर १९४८ साली ६४ व १९५०-५१ साली १२० खड्डे तयार करण्यात आले. १९४३ साली डॉ. सी. एन. आचार्य यांनी कराड नगरपालिकेस भेट देऊन टाऊन कंपोस्ट खत तयार करण्याची शास्त्रोक्त पध्दती समजावून दिली. त्याप्रमाणे नगरपालिकेने १९५०-५१ मध्ये या

खड्याची संख्या १२० केली. तरीही ती अपुरी पडू लागल्याने रि. स. नं. ३२८ मधील ३ एकर जमीन १९५४ मध्ये घेऊन त्यात १३८ खड्डे काढले. १९५५ साली कंपोस्ट खड्डयाची संख्या २५८ नी वाढली. दरसाल १३०० टन टाऊन कंपोस्ट खत तयार होत असे एका खड्डयास २५ रु. किंमत होती. या कामी ३ नोकर नेमले[७३].

१९६६-६७ साली लहान ५८ व मोठे १२९ कंपोस्ट खड्डे तयार केले. कंपोस्ट खत २४ X ६ X २ १/२ प्रत्येक खड्डयास ४६ रु. दर होता[७४].

कंपोस्ट खत तयार करण्याचे शास्त्रोक्त शिक्षण पुणे येथे होते. मे सुपरिटेंडेंट ॲगिकल्चरल ऑफिसर, पुणे विभाग यांचे सर्क्युलर नं.C ३/७८/TC/६४/६५/२०६५/१९६४ पत्र ऑफिस रिपोर्ट पाहिला. या शास्त्रोक्त पध्दतीने कंपोस्ट खत तयार करणेचे शिक्षण घेण्यासाठी कराड नगरपालिकेने श्री एस. टी. शिंदे, सॅनिटरी इन्स्पेक्टर यांना पाठविले[७५].

ड्रेनेज -

सुरुवातीच्या काळात शहरातील गटारे उघडी नि कच्ची असल्यामुळे ती कितीही स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला तरी त्यामधून सांडपाण्याचा निचरा बरोबर होऊ शकत नाही ही वस्तुस्थिती शहराच्या आरोग्यास धोक्याची आहे. शहरात अंडरग्राऊंड ड्रेनेजची सोय झाल्या खेरीज हा धोका टाळण्यासारखा नाही. अंडरग्राऊंड ड्रेनेज झाल्यावर फ्लशिंग पध्तीने संडासाची सुधारणा होईल व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने सर्वात महत्वाची असलेली ही 'अंडर ग्राऊंड ड्रेनेजची' कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी नगरपालिकेने ब-याच वर्षापासून प्रयत्न चालू केले व नगरपालिकेने मागणी केल्यावरुन मे. एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, सदर्न सॅनिटरी डिस्ट्रिक्ट यांनी ४,५०ट,००० रु. ड्रेनेजची स्कीम तयार केली व ती नगरपालिकेकडे पाठविली. परंतु यावेळी पाणी पुरवठयाची

मोठी योजना पुरी करण्यास नगरपालिकेस बरेच कर्ज झाल्याने सदर ड्रेनेजची योजना मागे पडली.

१९४१ साली सांडपाण्याच्या निकालासाठी जागोजाग सुमारे ८,१३४ फूट लांबीची गटारे दुरुस्त करण्यात आली. शिवाय १,८३० फू ट लांबीची मोठी गटारे, व ३,३१८ फू ट लांबीची लहान गटारे बांधण्यात आली.

अंडर ग्राऊंड ड्रेनेज योजनेच्या पहिल्या भागाच्या खर्चाचा अंदाज ६,६०,००० पर्यंत आहे. या बाबतचे प्लॅन्स व एस्टीमेटस करण्याचे काम नगरपालिकेने मे पब्लिक हेल्थ इंजिनिअर पुणे यांच्याकडे सोपविले व प्राथमिक खर्चाची रक्कम रु. ५,६१५ भरली[७६].

१९६५ साली मा. पी.डी.पाटील यांनी आपल्या कर्तृत्वाच्या आधारे महाराष्ट्रातील मोठमोठया शहरांना जे जमले नाही ते प्रत्यक्षात भुयारी गटार योजना आंमलात आणून दाखविले. १९६५ साली ५५,००,००० रु. खर्चाची भुयारी गटार योजना हाती घेऊन ३-४ वर्षात पूर्ण केली व शहरातील सर्व सार्वजनिक व खाजगी संडास आणि मो-या या भुयारी गटार योजनेस जोडण्यात आल्या. त्यामुळे शहरातील स्वच्छता आणि आरोग्य यात क्रांतीकारक बदल झालेला आहे. विशेष म्हणजे भुयारी गटार योजनेसाठी घेतलेल्या सर्व कर्जाची मुदतपूर्व परत फेड केलेली आहे.

या योजनेसाठी ३३% शासकीय अनुदान व ६७% नगरपालिकेने खर्च केले[७७].

गटार बांधणी बरोबर गटर साफ-सफाई यांनाही तितकेच महत्व दिले. कारण आरोग्याच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची बाब आहे. गटर मध्ये रोगजंतुची वाढ होऊ नये यासाठी गटर सफाई व निर्जंतुक करणेसाठी कराड नगरपालिकेने मोलाची कामगिरी केलेली आहे. सफाई कामगारांच्या कडून गटर स्वच्छ करून घेतली जातात. त्यासाठी

दरवर्षी बजेटमध्ये वेगळी तरतूद केली आहे. गटर बांधणी व दुरुस्तीसाठी वेगळी तरतूद अंदाजपत्रकात केलेली आहे. १९८३-८४ साली ८८४४ रु. खर्च आला व १९८७-८८ ५०,००० व १९९३ - ७५,००० रु. खर्च आला[७८].

संडास -

सार्वजनिक आरोग्यावर परिणाम करणारा दुसरा घटक म्हणजे मैला या मैल्याची जर वेळीच विल्हेवाट लावली नाहीतर रोगराई अधिक वेगाने पसरली जाते. म्हणून कराड नगरपालिकेने या गोष्टीकडे कटाक्षाने लक्ष पुरविले आहे. त्याचा निचरा करण्यासाठी योग्य ती व्यवस्था केली आहे.

१८६६ पर्यंत शहरात संडासाची काहीच व्यवस्था नव्हती म्हणून नगरपालिकने दाभोळ दरवाज्याजवळ दोन आणि सोमवार पेठेत मामलेदार कचेरीच्या पूर्वेस तीन असे एकूण पाच सार्वजनिक संडास बांधले. संडास सफाईचे काम नगरपालिकेच्या भंगी नोकरास देऊन त्याचा पगार मासिक पाच करण्यात आला. १८८५ साली नगरपालिकेने शहरात ठिकठिकाणी एकूण २० नवीन संडास बांधले. १८९० पूर्वी खाजगी संडासाची संख्या १८६ होती. घरमालक स्वखर्चाने त्याची साफ सफाई करुन घेत ते काम व्यवस्थित होत नसल्याने सार्वजनिक आरोग्यास धोक्याचे असल्याने हे काम नगरपालिके मार्फत करावे आणि त्यासाठी भंगीपट्टी बसवावी असा निर्णय नगरपालिकेने ता. ९-१०-१८८८ रोजी घेतला यात नगरपालिकेचा दुसरा हेतू असा होता की केवळ सार्वजनिक संडास सफाईसाठी ठेवावी लागणारी साधने व भंगी नोकर पगार यांच्या खर्चात बचत व्हावी हा होता व या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी नगरपालिकेने जरुर ते भंगी नोकर नेमून मैल्यासाठी एक हौदाची गाडी खरेदी केली.

शहरातील खाजगी व सार्वजनिक संडासाची संख्या वाढत गेल्याने मैला वाहतूकीसाठी १९४८ साली एक व १९५१ साली दोन अशा हौदाच्या मोटार गाडया खरेदी केल्या. १९५५ साली एक डिझेल ट्रॅक्टर नि मैल्यासाठी तीन ट्रक ट्रेलर्स खरेदी केले. १९५५ साली खाजगी संडासाची संख्या ७१७ होती व सफाईसाठी १५ भंगी नोकर नेमले. सिंगल सीटच्या संडासाला वार्षिक बारा रु. व डबलसीटच्या संडासाला एकवीस रु. भंगीपट्टी दर घेतला व भंगीपट्टीचे वार्षिक उत्पन्न ८३६० मिळाले. खाजगी संडास सफाई भंग्याचा वार्षिक पगार १२,६०० दिला [७९].

१९८१-८२ साली खाजगी संडास २०० व सार्वजनिक २८४ होते [८०].

१९८५-८६ साली १४३९ खाजगी संडास त्यासाठी २८ मैला सफाई कामगार नेमले [८१].

१९८६-८७ २९७ खाजगी संडास होते [८२].

१९९३-२९४१ खाजगी संडास व ३०७ सार्वजनिक संडास होते. हे संडास भुयारी गटाराला जोडण्यासाठी २,७३,००० नगरपालिका अनुदान १,७२,००० नगरपालिका कर्ज व १,४१,००० शासकीय अनुदान असे ५,८६,००० खर्च करण्यात आला. मा. पी.डी.पाटील यांनी मागासवर्गीय ४१ घर मालकांना १,८४,००० अनुदान व १,८४,००० कर्ज देऊन त्यांना संडास बांधण्यास लावून ती भुयारी गटर योजनेस जोडली. तसेच सन १९७३ पूर्वीच्या जुन्या घरांना २७२८६ अनुदान व ५,८३,००० कर्ज पुरवठा करुन संडास भुयारी गटार योजनेस जोडून घेतली [८३].

लोकसंख्येची वाढ जसजसी होत गेली तसतसे संडासाची अधिक अधिक गरज भासू लागली ही गरज भागविण्यासाठी नगरपालिकेनी भरीव कामगिरी केली.

स्वच्छता गृह -

कराड नगरपालिकेने शहराच्या ठिकठिकाणी स्वच्छता गृह बांधले आहेत. १९८१-८२ साली ६७ स्वच्छता गृह बांधल आहेत[८४].

१९८६-८७ साली स्वच्छता गृहे बांधण्यासाठी ५०,००० रु. खर्च करण्यात आले. १९९२-९३ साली स्वच्छता गृहासाठी १,००,००० रु. तरतूद करण्यात आली व गरजेनुसार त्याची संख्या वाढविण्यात अली. वेळोवेळी सफाई कामगारांकडून स्वच्छ ठेवल्या जातात. जंतुनाशकाचा वापर करुन त्या निर्जंतुक केल्या जातात दुर्गंधी नाशक औषधाची फवारणी वारंवार केली जाते. मलेरिया मुकादम वॉर्ड इन्स्पेक्टर सॅनेटरी इन्स्पेक्टर इ. स्वच्छतेच्या कामावर अधिक लक्ष असते. नगरपालिका पाण्याच्या टॅंकर मधून पाणी आणून स्वच्छ ठेवल्या जातात[८५].

**खर्च -**

कराड नगरपालिकेने आरोग्य खात्यावर खालीलप्रमाणे खर्च केला आहे हे खालील तक्त्यावरुन आपणास कल्पना येईल.[८६]

तक्ता क्र. ५

| अ.नं. | सन | शहर स्वच्छतेसाठी केलेला खर्च |
|---|---|---|
| १. | १९६२-६३ | ११०२७० |
| २. | १९६६-६७ | १२४६५० |
| ३. | १९७१-७२ | १४८१४३ |
| ४. | १९७७-७८ | ८२१२० |
| ५. | १९८३-८४ | ८२८८७२ |
| ६. | १९८७-८८ | २६५८७७ |
| ७. | १९९०-९१ | १८०७६६९ |
| ८. | १९९२-९३ | २२२६७ |

सन १८५५ ते १९६१ पर्यंतचा निव्वळ सार्वजनिक व आरोग्य शहर स्वच्छतेचा एकूण खर्च मिळत नसला तरी नगरपालिकेची स्थापनाच मुळात या सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छतेसाठी झाली असल्यामुळे वरील तक्त्यावरुन मिळणारा खर्च हा या कारणासाठीच झालेला कराड नगरपालिका रेकॉर्डवरुन आढळून येतो.

वरील तक्त्यावरुन असे दिसते की खर्चाचे प्रमाण प्रत्येक वर्षी वाढतच गेलेले दिसते. फक्त १९७७-७८ साली ते कमी झालेले दिसून येते.

एकंदरीत कराड नगरपालिका रेकॉर्डचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, कराड नगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता या खात्यामार्फत अनेक महत्वपूर्ण कामे केलेली आहेत. अनेक साथींना प्रतिबंध केला आहे. नागरिकांचे आरोग्य जास्तीत जास्त चांगले ठेवण्याचा कसोसीने प्रयत्न केला व अशा रितीने कराड नगरपालिकेने गेल्या १३८ वर्षात खालील विधायक कामे केलेली दिसून येतात.

१. कॉलरा रोखणेसाठी उपाय

२. देवी साथ रोखणेसाठी उपाय

३. प्लेग साथ थांबविणेसाठी उपाय

४. कुटुंब नियोजन कार्यक्रम यशस्वी राबविला

५. गोरगरिब लोकांना मोफत वैद्यकिय सेवा पुरविल्या

६. माता-बालसंगोपन केंद्र

७. कृष्ठरोग प्रतिबंधात्मक उपाय

८. मलेरिया विरोधी मोहिम

९. जागतिक आरोग्य दिन साजरा केला

१०. शहर स्वच्छता

महाराष्ट्रातील इतर नगरपालिकेंनी अनुकरण करावे असे काम कराड नगरपालिकेने केले व आजही करत आहे.

## संदर्भ


१. पाटील पी. डी. - संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ १८५५ ते १९५५ पृ. २३.

२. कित्ता - पृ. २९.

३. कराड नगरपालिका रेकॉर्ड - १८५९.

४. पाटील पी. डी. - संपादक - कराड न. पा. शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ १८५५ ते १९५५ पृ. २९-३०.

५. कराड नगरपालिका रेकॉर्ड - १९२८.

६. जदुनाथ सरकार- शॉर्ट हिस्ट्री ऑफ औरंगजेब - पृ. २५३.

७. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति गंथ १८५५-१९५५ पृ. २९.

८. कित्ता - पृ.६१.

९. ढवळे ना. वा. दैनिक सकाळ, लेख कात्रण, दि. २०-११-१९९२.

१०. कित्ता - दि. १८ डिसें. १९९२.

११. कराड नगरपालिका रेकॉर्ड - १९४९.

१२. पाटील पी. डी. - संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५-१९५५, पृ. १२७.

१३. कित्ता - पृ. ३८, ६२, ७१, ७६, ८३-८४, ९३.

१४. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९७८-७९.

१५. कराड नगरपालिका रेकॉर्ड - १९९२-९३.

१६. पाटील पी. डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ १८५५-१९५५, पृ. ५२.

१७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - सन १९४५.

१८. पाटील पी. डी- - संपादक - कराड नगरपालिक शतसांवत्सरिक स्मृति गंथ १८५५ ते १९५५ पृ. ५१-५२, ९४, १०१, १२४.

१९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९ ६३-६४.

२०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृतांत १४ सप्टें. १९९३.

२१. कराड नगरपालिक रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९७८.

२२. कित्ता - ज. प्रो. बुक १९७१-७२.

२३. कित्ता - ज. प्रो. बुक १९५२-५३.

२४. कित्ता - ज. प्रो. बुक १९८०-८१.

२५. कित्ता - ज. प्रो. बुक १९६६-६७.

२६. कित्ता - ज. प्रो. बुक १९६४.

२७. पाटील पी. डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. २९.

२८. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९६५-६६.

२९. कित्ता - ज. प्रो. बुक १९६६-६७.

३०. कित्ता - ज. प्रो. बुक १९७५-७६.

३१. कित्ता - ज. प्रो. बुक १९६८-६९.

३२. कित्ता - ज. प्रो. बुक १९६६-६७.

३३. कित्ता - ज. प्रो. बुक १९६८-६९.

३४. कित्ता - ज. प्रो. बुक १९५७.

३५. कित्ता - ज. प्रो. बुक १९५७.

३६. कित्ता - ज. प्रो. बुक १९६४.

३७. कित्ता - ज. प्रो. बुक १९५८-५९.

३८. कित्ता - ज. प्रो. बुक १९७८-७९.

३९. कित्ता - ज. प्रो. बुक १९८२.

४०. कित्ता - ज. प्रो. बुक १९८१-८२.

४१. कित्ता - ज. प्रो. बुक १९८३-८४.

४२. कित्ता - ज. प्रो. बुक १९८४-८५.

४३. कित्ता - ज. प्रो. बुक १९७४.

४४. कित्ता - ज. प्रो. बुक १९७४.

४५. कित्ता - ज. प्रो. बुक १९६७-६८.

४६. कित्ता - ज. प्रो. बुक १९८३-८४.

४७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - जमाखर्च अंदाजपत्रक १९७३-१९९३.

४८. कराड नगरपालिका रेकॉर्ड -ज. प्रो. बुक १९५१-५२.

४९. कित्ता - ज. प्रो. बुक १९५५-५६.

५०. कित्ता - ज. प्रो. बुक १९५२-५३.

५१. कित्ता - ज. प्रो. बुक १९६८-६९.

५२. कित्ता - ज. प्रो. बुक १९५१-५२.

५३. कित्ता - ज. प्रो. बुक १९८१-८२ व सॅ. इन्स्पेक्टर यांचा १९८२ १०-५-१९८५ पत्र व रिपोर्ट.

५४. कित्ता - ज. प्रो. बुक १९५८-५९.

५५. कित्ता - ज. प्रो. बुक १९७१-७२.

५६. कित्ता - ज. प्रो. बुक १९७५-७६.

५७. कित्ता - ज. प्रो. बुक १९७३-७४.

५८. कित्ता - ज. प्रो. बुक १९८८-८९.

५९. पाटील पी. डी. - संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. १०१.

६०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९५८-५९.

६१. कित्ता - ज. प्रो. बुक ठराव नं. २/१५ १९५८.

६२. कित्ता - ज. प्रो. बुक १९६०-६१.

६३. कित्ता - ज. प्रो. बुक १९६६-६७.

६४. कित्ता - ज. प्रो. बुक १९८०.

६५. कित्ता - ज. प्रो. बुक ठराव नं. ३९७, १९८२.

६६. करड नगरपालिका रेकॉर्ड - वार्षिक जमाखर्च अंदाजपत्रक १९९३.

६७. पाटील पी. डी. - संपादक कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ -१९५५, व ज. प्रो. बुक १९५२-१९६७ व जमाखर्च अंदाजत्रक १९७२-९३.

६८. कराड नगरपालिका रेकॉर्ड - सॅनिटेशन विभाग हजेरी पत्रक.

६९. पाटील पी. डी. - संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. १००.

७०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९७४.

७१. कित्ता - ज. प्रो. बुक १९८१-८२.

७२. पाटील पी. डी. - संपादक- कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, पृ. ११७.

७३. कित्ता - पृ. ५१, ६१, ९४, १००, ११८.

७४. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९६६-६७.

७५. कित्ता - ज. प्रो. बुक १९६४.

७६. पाटील पी. डी., संपादक- कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, पृ. ९४, ११८, ११९.

७७. पाटील विठ्ठल, लेख - रामप्रताप दिवाळी विशेषांक, १९९१

७८. कराड नगरपालिका रेकॉर्ड . मिटींग १४ सप्टें. १९९३ व जमाखर्च अंदाजपत्रक, १९९३.

७९. पाटील पी. डी. - संपादक कराड न. पा. शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, पृ. २८,२९,६०, ७१, ८१, ११७.

८०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९८१-८२.

८१. कित्ता - ज. प्रो. बुक १९८५-८६.

८२. कित्ता - ज. प्रो. बुक १९८६-८७.

८३. कित्ता - मिटींग वृत्तांत १४ सप्टें. १९९३.

८४. कित्ता - ज. प्रो. बुक १९८१-८२.

८५. कित्ता - ज. प्रो. बुक १९९२-९३.

८६. कित्ता - ज. प्रो. बुक १९६२-६७ व जमाखर्च अंदाजपत्रक १९७१-९२.